सकाळ अॅग्रोवन

# 'एनआरसीजी'मध्ये द्राक्ष मूल्यवर्धनावर प्रशिक्षण

**पुणे** : द्राक्ष संशोधन केंद्रास भेट देणाऱ्या तमिळनाडू येथील १५ द्राक्ष उत्पादक, शेतकरी उत्पादक कंपनीच्या सदस्यांसाठी 'द्राक्षामधील मूल्यवर्धन तसेच शेतकरी उत्पादक कंपनीची प्रभावशाली कार्यप्रणाली' या विषयावर सोमवार (ता. २५) रोजी एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन केले होते.

या अंतर्गत राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आर. जी. सोमकुंवर यांनी 'द्राक्ष लागवड सद्यःस्थिती आणि भविष्यातील संधी' या विषयावर, तर महाअॅग्री फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक विजय गोफणे यांनी शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना, सुनियोजित व्यवस्थापन, कृषी निविष्ठांचे नियोजन, द्राक्ष निर्यात धोरण या विषयी मार्गदर्शन केले. कृषी व्यवसाय उद्भवन केंद्राचे प्रकल्प अन्वेषक आणि प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अजय कुमार शर्मा यांनी द्राक्षाचे मूल्यसंवर्धन याविषयी मार्गदर्शन करताना संस्थेद्वारे नवीन द्राक्ष जाती, द्राक्ष बिस्किटे, ब्रेड या भविष्यातील संधी नमूद केल्या.

Pune, Main
28/04/2022 Page No. 5